सामान्य माणसाचा उंचावलेला स्वर

# चपराक

■ पुणे ■ वर्ष : ५
■ अंक : १६
■ पाने : ४
■ मूल्य : ३ ₹

संपादक : घनश्याम पाटील

Website :www.chaprak.com

नेत्रदान करा!




- भारताची लोकसंख्या : ११८ करोड
- रोज मृत पावणाऱ्यांची संख्या : ६२,३८९
- रोज जन्म घेणाऱ्यांची संख्या : ८६,८५३
- भारतातील अंध लोकांची संख्या : ६,८२,४९७

जर रोज मृत होणाऱ्या लोकांनी आपले नेत्रदान केले तर फक्त १२ दिवसात भारतातील सर्व अंध हे जग बघू शकतील...

तुमच्या डोळ्यांचे दान करून
इतर गरजूंना ही सृष्टी
पाहण्याची संधी द्या!

सुकांता™

विजयकुमार मर्लेचा, विश्वस्त सुकांता चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे

■ सोमवार, ११ ते १७ मे २०१५ ■ RNI No. MAHMAR/2011/35979 ■ पोस्टल नोंदणी क्र. : PCW/159/2014-2016

Licensed to post without prepayment of postage no. WPP - 14 Posted at Pune PSO on every wednesday, date of publication 13/05/2015



# वादाला का भीता?

**बाबासाहेब पुरंदरे यांच्यावर जे आक्षेप घेतले जात होते ते राजकीय हेतूने, पूर्वग्रह ठेवून आणि जातीय भूमिकेतून होते हे सिद्ध झाले. अशाने आधीच बंद पडत चाललेली आपली दुकानदारी बंद होणार, हे ध्यानात येताच काही ब्रिगेडी टाळकी पेटून उठली आहेत. वाटेल त्या थराला जाऊन, खऱ्याचे खोटे आणि खोट्याचे खरे ठरवून हे लोक आपले घोडे पुढे दामटत आहेत. संजय सोनवणी यांनी मुद्देसूदपणे आणि अभ्यासपूर्वक बाबासाहेबांवरील सर्व आरोप फेटाळून लावल्याने यांची गोची झाली आहे.**

***... होय,*** संजय सोनवणी हे एक तटस्थ वृत्तीचे आणि ठाम भूमिका घेणारे साहित्यिक आहेत. वेगवेगळ्या साहित्य प्रवाहात कणखर आणि परखड भूमिका घेऊन त्यांनी अनेक वाद ओढवून घेतले असले तरी त्यांनी सत्याची कास सोडली नाही. त्यांच्या काही भूमिकांविषयी मतभेद जरूर असू शकतात; मात्र हा माणूस नेक वृत्तीचा आणि साहित्य क्षेत्राशी प्रामाणिक आहे हे मान्य करावेच लागेल.

सध्या एकीकडे अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी करण्याचे दिवस आहेत, तर दुसरीकडे या स्वातंत्र्याचा अतिरेकही केला जातो. मध्यंतरी पेरूमल मुरूगन या लेखकाने या व्यवस्थेला कंटाळून स्वतःतील लेखकाचा मृत्यू झाल्याचे जाहीर केले, हा आपल्याकडील काळाकुट्ट इतिहास आहे. ही मुस्कटदाबी कुणा एका विचारधारेकडून, समाजाकडून होते असे नाही. सत्य काय हे जाणून न घेता केवळ आपला स्वार्थ पुढे दामटण्यासाठी जे राजकारण सुरू आहे ते अत्यंत निषेधार्ह आहे.

क्षमा आणि शांतीचा संदेश देणाऱ्या आपल्या देशात आजवर अनेक समाजद्रोह्यांनी थयथयाट सुरूच ठेवला आहे. राजकीय लाभापायी इथल्या पोखरलेल्या व्यवस्थेने अशा दुष्प्रवृत्तींना सातत्याने खतपाणी घातले. आज अन्न, वस्त्र आणि निवारा या माणसाच्या मुलभूत गरजा तो स्वबळावर पूर्ण करू शकतोय. इतकी समज आणि कुवत त्याच्यात निर्माण होण्याइतपत बदल नक्की झालाय. मात्र तरीही समाजाच्या अनेक गरजा आज दुर्लक्षित आहेत. साहित्य आणि संस्कृती हा आपल्या आदर्श समाजरचनेचा पाया आहे. तो मात्र दिवसेंदिवस तकलादू होत चालला आहे.

'महाराष्ट्र भूषण' श्रीमंत शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी त्यांची संपूर्ण हयात शिवसेवेसाठी घालवली. युगपुरूष शिवरायांचे चरित्र तळागाळापर्यंत पोहोचावे यासाठी त्यांनी जे कष्ट घेतले, जे कार्य उभे केले त्याला तोड नाही. शिवरायांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आपला समाज घडू शकेल, लोकापुढे शौर्य आणि पराक्रमाची मशाल तेवत राहील यादृष्टिने बाबासाहेबांनी जे कार्य उभे केले आहे त्याविषयी आपण कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे. त्यांचे हे काम अद्वितीय आहे. महाराष्ट्र सरकारने उशीरा का होईना पण त्यांना 'महाराष्ट्र भूषण' देऊन बाबासाहेब पुरंदरे यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली आहे. असे सारे असताना काही विकृत मनोवृत्तीचे लोक त्यांच्यावर खोटे आरोप घेऊन जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. महाराष्ट्राला जात, धर्म, प्रांत यावरून भांडत राहणे परवडणारे नाही, हे ठाऊक असूनही केवळ स्वतःचा स्वार्थ पुरा करण्यासाठी काहीजण आपल्यात भांडणे लावण्याचे उद्योग सुरू ठेवत आहेत.

बाबासाहेब पुरंदरे यांनी जे लेखन केले त्यातील आपल्याला हवा तो भाग, हव्या त्या पद्धतीने घेऊन टाळकी भडकवण्याचे काम वेगात सुरू आहे. आजची विचारी तरूणाई अशा भूलथापांना बळी पडणार नाही, मात्र त्यांच्यापुढे यातील सत्य आले पाहिजे. बाबासाहेबांच्या 'राजा शिवछत्रपती' या ग्रंथातील काही वाक्ये उचलून, त्याचे कपोलकल्पित संदर्भ जोडून समाजात दुही निर्माण करण्याचे कारस्थान सुरू आहे. अशा बिकट वेळी संजय सोनवणी या लढवय्या लेखकाने अत्यंत अभ्यासपूर्वक, जिद्दीने सत्य पुढे आणण्याचा चंग बांधला. बाबासाहेबांचे पुस्तक त्यांनी अभ्यासले आणि तथाकथीत काही अविचारी लोकाचे सर्व आरोप पुराव्यासह खोडून काढले. त्यामुळे बाबासाहेब पुरंदरे यांच्यावर जे आक्षेप घेतले जात होते ते राजकीय हेतूने, पूर्वग्रह ठेवून आणि जातीय भूमिकेतून होते हे सिद्ध झाले. अशाने आधीच बंद पडत चाललेली आपली दुकानदारी बंद होणार, हे ध्यानात येताच काही ब्रिगेडी टाळकी पेटून उठली आहेत. वाटेल त्या थराला जाऊन, खऱ्याचे खोटे आणि खोट्याचे खरे ठरवून हे लोक आपले घोडे पुढे दामटत आहेत. संजय सोनवणी यांनी मुद्देसूदपणे आणि अभ्यासपूर्वक बाबासाहेबांवरील सर्व आरोप फेटाळून लावल्याने यांची गोची झाली आहे.

**संपादकीय**
**घनश्याम पाटील – ७०५७२९२०९२**

संजय सोनवणी हे मराठीतील असे एकमेव लेखक आहेत की ज्यांचे पुस्तक अमेरिकेत, व्हाईट हाऊस मध्ये 'रेफरंस बुक' म्हणून ठेवण्यात आले आहे. मराठी आणि इंग्रजीत त्यांनी विपुल लेखन केले आणि त्यांचे साहित्य जगभर वाचले जाते. वंचित, उपेक्षित, भटके विमुक्त, आदिवासी, दलित यांचे सुखदुःख मांडण्यासाठी त्यांनी प्रचंड कष्ट घेतले. पुरूषोत्तम खेडेकर यांच्यासारख्या सूड भावनेने वागणाऱ्या माणसाला न्यायालयात अधिकृत माफी मागण्यास भाग पाडले. त्यांच्यावर गुन्हे दाखल करून कायदेशीर मार्गाने लढत दिली. हिंदू आणि हिंदुत्व या दोन्हीपासून हजारो मैल दूर असणाऱ्या सोनवणी यांनी बाबासाहेब पुरंदरे यांच्यावरील आरोप विवेकाने खोडून काढले आहेत. त्यासाठी लागणारी सच्चाई आणि अच्छाई त्यांच्याठायी आहे. जातीपातीच्या बाहेर पडून अशी न्याय भूमिका घेणाऱ्या आणि धाडसाने सत्य पुढे आणणाऱ्या सोनवणी यांचे कौतुक करावे तेवढे कमीच.

बाबासाहेब पुरंदरे हे इतिहास पूत्र आहेत. त्यांनी शिवकाल जिवंत केला आहे. एव्हरेस्टसारख्या उंचीचा हा ध्येयवेडा माणूस अनेकांच्या हृदयावर राज्य करतोय. ज्यांचा प्रत्येक श्वास शिवमय होऊन गेलाय, ज्यांनी आपल्या आयुष्यातील क्षण न क्षण शिवाजीराजांच्या प्रेमात घालवलाय त्यांच्याविषयी आमच्या मनात श्रद्धाभाव आहे. बाबासाहेबांवर केवळ 'ब्राह्मण' म्हणून टीका करणे हे काही 'ब्रिगेडियर' नेत्यांचे कारस्थान आहे. संभाजीनगर येथे बोलताना बाबासाहेबांच्या 'महाराष्ट्र भूषण' बद्दल अभिनंदन करणाऱ्या शरद पवार यांनी जितेंद्र आव्हाड यांची भूमिका मात्र पक्षाची नसून ती त्यांची स्वतःची आहे, असे केविलवाणे विधान केले. यातून पवारांसारख्या नेत्याची विखारी वृत्ती पुन्हा एकदा महाराष्ट्राला जवळून पाहता आली.

संजय सोनवणी यांच्या चिकित्सेनंतर नगर येथील 'शिवप्रहार' या संस्थेचा अध्यक्ष असलेल्या संजीव भोर नावाच्या एकाने सोनवणी यांना धमक्या देणे सुरू केले आहे. त्याने सोनवणी यांना सूड भावनेने आव्हान देऊन नगरला बोलवून घेतले. आजपर्यंत अनेकवेळा लेखकांना काळे फासले गेले, त्यांच्यावर शाई टाकण्यात आली, लेखकांचा निषेध करण्यात आला किंबहुना लेखकाला स्वतःतील लेखक मेल्याचेही जाहीर करावे लागले. मात्र मराठीच्या इतिहासात प्रथमच असा एक लेखक पुढे आला की ज्याने आव्हान देणाऱ्याला ठामपणे सांगितले, की ''ठिकाण आणि वेळ तू ठरव, तू मला काळे फासण्याच्या आधी मी तुझ्या कानाखाली ओढतो. तुझ्या मुस्कटात ठेऊन देतो!'' स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी सांगितले होते की, ''लेखण्या मोडा आणि बंदुका हातात घ्या!'' सोनवणी यांनी ज्या बेडरपणे हे आव्हान स्वीकारले ते पाहता आता स्वातंत्र्यवीरांचे विचार खोलवर रूजलेत असे मानायला हरकत नाही.

मात्र या संजीव भोरने संजय सोनवणी यांना बोलवण्याचा आततायीपणा केला. आपली आता काही खैर नाही हे ध्यानात येताच त्याने काही महिला गोळा केल्या. संजय सोनवणी यांच्या अंगावर या महिलांना सोडायचे आणि विनयभंग, अॅट्रॉसिटी असे गुन्हे दाखल करायचे असे कारस्थान त्याने रचले. याची माहिती मिळताच नगरला गेलेल्या सोनवणी यांनी माघार घेतली आणि भोर याचा कुटील डाव हाणून पाडला.

आगरकरांनी विचारले होते की, ''वादाला का भीता?''

ज्याला सत्य जाणून घ्यायचे आहे त्यांची चर्चेची तयारी असते. ते कोणत्याही तात्त्विक वादाला कधीही घाबरत नाहीत. मात्र संजीव भोर याच्यासारख्या भ्याड माणसाने सोनवणी यांच्यासारख्या दिग्गजाला आव्हान देऊच नये. भोर याच्या आडून हे आव्हान सरळ सरळ 'संभाजी ब्रिगेड'चे आहे हे पुरते ठाऊक असल्याने सोनवणी यांनी ते स्वीकारले पण भोरने पळपुटेपणा करत कट रचला.

बाबासाहेब पुरंदरे आणि संजय सोनवणी यांच्यात वैयक्तिक काहीही संबंध नाहीत. बाबासाहेबांच्या लेखनावर चुकीचे आक्षेप घेतल्याने संजय सोनवणी यांच्यासारखा एक सत्लेखक दुखावला गेला आणि त्याने सत्य पुढे आणण्याचे काम धाडसाने केले. पुरंदरे आणि सोनवणी या दोन मात्तबर लेखकांची भेट 'चपराक'च्या पुढाकाराने लवकरच घडवून आणत आहोत, मात्र यात कसलेही राजकारण, स्वार्थ नाही हे सूर्यप्रकाशाइतके सत्य आहे. केवळ सत्य पुढे यावे आणि आजच्या तरूणाईच्या मनात जे जातीभेदाचे विष कालवले जात आहे ते दूर व्हावे या प्रांजळ भूमिकेतून संजय सोनवणी यांच्यासारख्या खमक्या लेखकाने हे शिवधनुष्य पेलले आहे. त्यांच्यावर सध्या राळ उडवण्यात येत असून त्यांची वैयक्तिक बदनामी केली जात आहे. हे सारे संतापजनक आहे. अशा बिकट प्रसंगी आपण सर्वजण संजय सोनवणी यांच्या पाठिशी राहणे, बाबासाहेबांसारख्या ऋषितुल्य व्यक्तिचा गौरव करणे हे आपले कर्तव्यच आहे.

■■

# बाबासाहेबांवरील आक्षेपांना 'चपराक'



**■ शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांना 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार जाहीर झाल्यानंतर त्यांच्याविरूद्ध काहींनी अपप्रचार सुरू केला आहे. बाबासाहेबांच्या लेखनातील हवा तो भाग सोयीस्करपणे घेऊन त्याला जातीय रंग दिले जात आहेत. जातीजातीत फूट पाडून वाद निर्माण करणे आणि आपल्या स्वार्थाची पोळी भाजणे हा काही स्वार्थसंकुचित लोकाचा उद्योग आहे. सुप्रसिद्ध साहित्यिक आणि संशोधक संजय सोनवणी यांनी बाबासाहेबांवर घेतल्या जाणाऱ्या आक्षेपांना अभ्यासपूर्वक, तात्त्विक उत्तर दिले आहे. सत्य हे कधीही लपून राहत नाही, या न्यायाने पुरंदरे यांच्यावर अकारण चिखलफेक करणाऱ्यांनी हा लेख अवश्य वाचावा. सोनवणी यांनी केलेली ही चिकित्सा साप्ताहिक 'चपराक'च्या वाचकांसाठी मुद्दामहून देत आहोत.**

***बाबासाहेब*** पुरंदरे यांच्या राजा शिवछत्रपती या पुस्तकातील काही विधानांबद्दल सध्या वादळ सुरु आहे. तसे हे वादळ आजचे नाही. गेली काही वर्ष ते अधूनमधून डोके काढत सुरु आहे. पुरंदरेंना राज्य शासनाने 'महाराष्ट्र भूषण' हा पुरस्कार दिल्याने हे वादळ आता तांडवात बदलण्याची शक्यता आहे. हा पुरस्कार शिवद्रोह्याला दिला जातो आहे असा प्रमुख आक्षेप असून त्यासाठी त्यांच्या पुस्तकातील आक्षेपार्ह मानली जाणारी विधाने/पुस्तकातील मजकुराची पाने सोशल मिडियातुन वावटळीसारखी सर्वत्र पसरवली जात आहेत. यांचा प्रतिवाद करण्यासाठी पुरंदरेंचे समर्थकही सज्ज असतातच पण आरोपक आणि प्रतिवादक यांतील एकंदरीत जो उग्र आवेश आहे तो अशा वादांना कधीही पुर्णविराम देऊ शकणार नाही हे उघड आहे.

मी हे पुस्तक आजवर वाचले नव्हते. मला प्रासादिक/पाल्हाळीक/प्रवचनी/प्रचारकी/नाटकी पुस्तके वाचायला आवडत नाहीत. अकरावी-बारावीत असताना पाबळच्या वाचनालयात कधीतरी हे पुस्तक हाती आले होते पण चाळुन ठेवुन दिले. आता मात्र वाचणे भाग पडले. वाचले आहे. भाषा प्रभावी आणि प्रवाही आहे हे नक्कीच.

पुस्तकाच्या अंतरंगात शिरायच्या आधी नेटवर जी माहिती मिळते ती नमुद करतो. या ग्रंथाच्या सोळा आवृत्त्या आजवर प्रकाशित झाल्या असून पाच लाख घरांत हे पुस्तक गेले आहे, असे विकिपिडियावरील माहितीत म्हटले आहे. हे खरे मानले तर पाच लाख प्रती विकल्या गेल्या आहेत असे म्हणता येईल. कोणत्याही मराठी पुस्तकाच्या एवढ्या प्रती मराठीत विकल्या गेलेल्या नाहीत. त्यामुळे पुरंदरेंनी शिवाजी महाराजांना घरोघर पोहोचवले, हे विधान अतिशयोक्त असले तरी बहुसंख्य मराठी जनांपर्यंत पोहोचवले हे मान्यच करावे लागेल. इतर कोणतेही पुस्तकरुपात प्रकाशित शिवचरित्र हा विक्रम मोडु शकलेले नाही असे स्पष्ट दिसते. शिवाय शिवाजी महाराजांवर त्यांनी असंख्य व्याख्यानेही दिलेली आहेत. ग. ह. खरेंसारखे विद्वान इतिहास संशोधक त्यांना गुरुस्थानी लाभले असेही दिसते. बाबासाहेब पुरंदरे यांनी महाराष्ट्रातील गडकिल्ल्यांचा आणि मराठा साम्राज्य आणि शिवकालीन ऐतिहासिक दस्तऐवजांचा सखोल अभ्यास केला, असेही विकीत नमुद आहे. असे असेल तर बाबासाहेब पुरंदरे केवळ शिवशाहीर नसुन इतिहास संशोधकही आहेत असेच म्हणावे लागेल. समजा नसले तरी शिवचरित्र लिहायचे म्हणजे त्यांना त्याकाळी जी साधने उपलब्ध होती त्यातील काही साधने तरी त्यांना संदर्भासाठी वापरावे लागलीच असतील हे गृहित धरावे लागेल. शिवाय इतिहासकार होण्यासाठी कोणाकडे कसली पदवी असलीच पाहिजे हेही बंधन नसते, त्यामुळे पदवी दाखवा हा आक्षेपही योग्य नाही. तरीही शाहीर व इतिहास संशोधक म्हणून त्याही अंगाने 'राजा शिवछत्रपती' या पुस्तकाकडे पहावे लागेल.

ते रा. स्व. संघाशी तरुणपणापासून संपर्कात होते अशीही माहिती यात नमुद असून ते स्वत: स्वयंसेवक होते की नाही याबाबत खात्रीशीर माहिती नाही.

त्यांनी इतरही लेखन केले असून या विषयाशी संबंधीत त्यांचे 'जाणता राजा' हे एक महानाट्य असून त्याचे असंख्य प्रयोग झाले आहेत. अर्थात यावरही आक्षेप आहेत, पण ते नाटक मी पाहिलेले नसल्याने त्याबाबत काही लिहु शकणार नाही! पण हेही नाटक लाखो लोकांनी पाहिलेले आहे. किमान अशा प्रकारचा महाराष्ट्रात झालेला (होत असलेलाही) एकमेव प्रयोग आहे असे नक्कीच म्हणावे लागेल.

**आता पुस्तकाबाबत आणि आक्षेपांबाबत...**

या पुस्तकाची प्रथमावृत्ती प्रसिद्ध होऊन सहा तरी दशके उलटली असतील. पुरंदरेंचा जन्म १९२१ चा. म्हणजे हे पुस्तक लिहायला लागलेला संभाव्य कालावधी लक्षात घेता ते लिहित्यावेळीस तिशीत असावेत. मी चौदावी आवृत्ती (२००१) वाचुन आक्षेपांवरील खालील निरिक्षणे नोंदवत आहे.

**आक्षेप १ :**

मराठा जहागीरदार, सरदारांना स्वाभिमान नाही, कुळाशिळाची चाड नाही, बेअब्रूची चीड नाही, हे लाचार, स्वार्थी, गुलाम पुरुष मोठेपणासाठी स्वत:ची आई सुद्धा विकायला कमी करणार नाहीत. (पान ८३) असे सांगुन या विधानावर सर्वात जास्त प्रक्षोभ व्यक्त केला जातो. हे विधान देतांना पुढील संदर्भ दिला जातो. (ब. मो. पुरंदरे , राजा शिवछत्रपती पा. ८३ , जुनी आवृत्ती)

अनंत दारवटकरांनी न्यायालयात विचारलेल्या प्रश्नावर पुरंदरे निरुत्तर झाले असेही सांगितले जाते.

माझ्याकडील आवृत्ती २००१ मधील आहे. १४ वर्ष जुनी. या आवृत्तीत पृष्ठ क्रमांक ८३ वरच नेमके काय म्हटले आहे हे पाहुयात:

ती असंतुष्ट होती. जहागीरदारांची आणि सरदारांची तिला चीड येई. यांना स्वाभिमान नाही, कुळाशीलाची चाड नाही, बेअब्रुची चीड नाही. मोठेपणासाठी स्वत:ची आईसुद्धा विकायला कमी करणार नाहीत हे लाचार, स्वार्थी, गुलाम. पुरुष कसले हे? देव, देश आणि धर्म प्रतिपाळील तोच पुरुष!

दोन्ही उद्धृते शांतपणे पडताळून पहा. पुरंदरेंच्या पुस्तकात या विधानात मुळात 'मराठा' शब्दच नाही हे सहज लक्षात येईल. हा शब्द कोठुन आणला? हे विधान करतांना लेखकाने तत्कालीन महाराष्ट्रातील अनागोंदी चितारत हे विधान केले आहे हे सलग वाचले तर स्पष्ट दिसते. सरदार-जहागीरदार फक्त मराठा होते की काय? मुरारपंत जोगदेव सरदार नव्हता काय? वरील विधान सरसकट सर्वच महाराष्ट्री जहागीरदार-सरदारांबाबत आहे, त्यात ब्राह्मणाला सुटका दिली आहे असे दिसते आहे काय?

दुसरे महत्त्वाचे असे की पुरंदरेंनी 'मराठा' हा शब्द पुस्तकात 'मराठी माणुस' म्हणुन वापरला आहे, जात म्हणून नाही. जेथे जेथे जात अनुस्युत आहे तेथे काय म्हटले आहे तेही पाहुयात:

क्षत्रीय मराठ्यांच्या तलवारी आणि ब्राह्मण मराठ्यांच्या लेखण्या सुलतानांच्या सेवेत दासींबटकींच्या अदबीने आणि नेकीने रमल्या होत्या. (पान ५५). विधान स्वयंस्पष्ट आहे. येथे मराठा जातीचा जसा उल्लेख आहे तसेच ब्राह्मणांचाही आहे. अन्यत्र मराठा जात ही 'कुळवंत' अथवा 'शहाण्णव कुळी' या विशेषणासहित उल्लेखली आहे. दोहोंना सारखेच झोडपले आहे असे स्पष्ट दिसेल.

मराठा जातीविषयी येणारा अजुन एक उल्लेख पहा : आणि या मंडळींना ओळखलत का? हे त्र्यंबकजीराजे भोसले, हे जिवाजीराजे भोसले, हे बाळाजीराजे भोसले, हे परसोजीराजे भोसले. ही खाशी खाशी भोसले मंडळी महाराजांच्या रक्ताची भाऊबंद होती... पण काय लिहायचे आता? (पान ३५८)

ही हतबुद्धता संतापाच्या रुपाने कोठे उमटली तर लेखकाला दोष द्यायचा की परिस्थितीला? महाराजांपेक्षा या अशा ९६ कुळी मऱ्हाटे (हा पुरंदरेंचा या संदर्भातच पुढच्याच परिच्छेदांत येणारा शब्द), त्यातही निकटच्या नातेवाईक मंडळीला शाइस्तेखान जवळ वाटला आणि त्याला जाऊन मिळाले. हे वास्तव नसेल तर पुराव्यांनीच खोडले पाहिजे पण या विधानाबाबत कोणी आक्षेपच घेतल्याचे वाचनात नसल्याने हे विधान सर्वमान्य आहे असा अर्थ सहज घेता येईल.

**आक्षेप २ :**

शिवबा दहा वर्षाचा झाला. मुलगा येवढा मोठा झाला... लग्नाचे वय. आईसाहेब आणि पंत कुजबूजू लागले. ठरले! फलटणच्या नाईक निंबाळकर यांची लेक आईसाहेबांच्या नजरेत भरली. पंतांनी शहाजी महाराज यांना पत्र पाठवले, हे लग्न पंतांनी हौसेने केले... हे विधान आक्षेपार्ह मानले गेले आहे कारण यातील 'कुजबुज' हा शब्द आणि 'हे लग्न पंतांनी हौसेने केले,' म्हणजे शहाजीराजांना डावलले. एक चाकर शहाजीराजांपेक्षा मोठा झाला का असा हा आक्षेप आहे.

याला जोडुनच दुसरा आक्षेप या विधानावर... आईसाहेबांवर ते फार माया करीत. ही बाई अशी तशी नाही, हिची जडणघडण कांही वेगळीच आहे, हे त्यांनी ओळखले होते. शिवबांवर तर खुद्द शहाजीराजांचाहि नसेल एवढा जीव पंतांचा होता... पंत देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण. गोत्र? - गोत्र शांडिल्य. पण खरे म्हणजे त्यांचे, आईसाहेबांचे शिवबांचे गोत्र एकच होते-सह्याद्रि! प्रचंड अवघड सह्याद्रि! पंत भारदस्त होते. जबरदस्त होते. सह्याद्रीसारखेच! (पान १२६)

या विधानातील 'गोत्र एकच' या शब्दावर आक्षेप आहे, तसेच 'ते फार माया करीत' आणि 'शिवबांवर तर खुद्द शहाजीराजांचाहि नसेल एवढा जीव पंतांचा होता.'

(पण याच्याच आधी पान १२५ वर काय म्हटलेय तेही पाहुयात.)

राजांच्या घरातले ते मानाचे, धाकाचे, दराऱ्याचे, मायेचे आणि ममतेचे वडिलधारे पुरुष होते. ते सर्वांवर हक्काने रागवत अन हक्काने प्रेम करत. (पान १२५).

पुन्हा हा पाठचा संदर्भ असतांना हे वाक्य वाचुन काही ओळी (ज्यात सत्तर वर्षीय दादोजींच्या राजकीय अनुभवांबाबत सांगण्यात जातात.) गेल्यानंतर येणारे आक्षेपार्ह मानले जाणारे विधान पाहिले तर कोण सुज्ञ पुरुष ते आक्षेपार्ह मानेल? 'वडिलधारे' या शब्दातच माया ममतेचे अर्थ सामावला आहे.

राहिले आता गोत्राचे. गोत्र ही वैदिक धर्मीय संकल्पना आहे. पुरंदरेही उत्तरेत वैदिक धर्माचा, वैदिक राज्यांचा आणि वैदिक संस्कृतीचा हे सुलतान विध्वंस करत होते, त्याच काळात महाराष्ट्रांतले धर्ममार्तंड पोथ्या उलथ्यापालथ्या करत खल करत बसले होते. (पान २५) असे विधान करतात. या वाक्याला माझा आक्षेप नाही कारण वैदिक धर्म स्वतंत्र आहे, वेगळा आहे हे मी सांगतच आलो आहे. त्यांनी उत्तरेतील कोणाला वैदिक मानले हे मी सांगु शकत नाही कारण त्यांनी ते स्पष्टही केलेले नाही पण तो येथे मुद्दा नसुन गोत्राचा आहे.

पुरंदरे उपमा-उत्प्रेक्षा पेरत लेखन करतात हे कोणाच्याही सहज लक्षात येईल. गोत्र म्हणजे काय? शूद्र वगळता सर्वांना (तीन वर्णांना) गोत्र असते. गोत्र म्हणजे ऋग्वेद रचना करणाऱ्या ऋषींचे थेट वंशज. रक्तसंबंधी. महाभारत काळात गोत्रे फक्त चार होती. ती म्हणजे अंगिरस, कश्यप, भृगू आणि वशिष्ठ. नंतर ती आठ बनली. त्यांच्याच वंशांत गोत्रकर्ते ऋषी झाल्याने ही संख्या आता चारशेच्या पुढे गेली आहे. ही का संख्या वाढली त्याचे उत्तर मी अन्यत्र दिलेले आहे.

वरील विधानात दादोजींचे मूळ गोत्र शांडिल्य दिले आहे पण त्यात शिवबांचे मूळ गोत्र दिलेले नाही. जे नाही ते कसे देणार? पण अनेक मराठे आज स्वत:ला क्षत्रीय समजतात, त्यांनी याचा विचार करावा. असो.

तर पुरंदरेंनी येथे प्रत्यक्ष सह्याद्रीची उपमा देत सह्याद्री गोत्र ठरवले. यात काव्यमय आणि महाराष्ट्राची खरी ओळख आहे. त्याच्याच अंगाखांद्यांवर खेळणारे मावळे यांचा नि वैदिक ऋषी गोत्राचा काय संबंध? हा सबंध महाराष्ट्रावरील प्रेमापोटी आणलेला आहे. गोत्र सह्याद्री म्हटल्यावर राग येत असेल तर अवघड आहे.

आता दादोजींना ते गुरु मानतात काय? शिक्षक मानतात काय हेही त्यांच्याच शब्दात पाहुयात:

'पण पंतांचे सर्वात बारकाईने लक्ष असे ते शिवबांच्या शिक्षणावर. लिहिणे-वाचणे शिकवण्यासाठी नेमलेल्या गुरुजींपाशी शिवबा बसे.' (पान १२७)

यात गुरुजीतुन गुरु आणि शिक्षणातुन शिक्षण हे दोन्ही शब्द आले आहेत. दादोजी गुरु होते असे पुरंदरेंनी कोठेही म्हटलेले नाही. न्यायनिवाड्यांत व अन्य राजकार्यात ते शिवबांना बरोबर ठेवत असे म्हटले आहे पण कोठेही गुरु शब्द येत नाही. रामदासांबाबतही असेच आहे, पण त्याबाबत नंतर.

म्हणजे, एकदा वडिलधारेपणा दिला गेलेला माणुस माया करतो यात गैरार्थ काढणे विकृती म्हणता येईल.

हे झाले पुस्तकातील विधानांबाबत, आक्षेपांबाबत आणि त्यातील फोलपणाबाबत! पण दादोजींचा संबंध भोसले घराण्याशी चाकर म्हनून कधीच नव्हता. जोही काही होता तो कोंढाण्याचे सुभेदार म्हनून हे मी सिद्ध करुन दाखवले आहे. जहागीरदाराचा चाकर आणि सुभेदार यातील फरक मोगलकालीन प्रशासन व महसुल पद्धतीबाबत नीट माहिती नसल्याने सुभेदार हा जहागीरदारापेक्षा मोठा असतो, एकच नव्हे तर परिसरातील अनेक जहागीरदार, मोकासदार, मिरासदार ते वतनदार हे त्याच्या महसुल व स्थानिक न्याय या संदर्भात सुभेदाराच्या अंकित असतात हे लक्षात घेतले पाहिजे. पुरंदरेही दादोजींना नामजाद सुभेदार (पान १२६) म्हणुन नंतर नेमले असे म्हणतात. नामजाद सुभेदार हे पद नाही. शिवाजी महाराजांच्या दादोजीसंबंधी चार अस्सल पत्रात दादोजी कोंडदेवु सुभेदार असाच उल्लेख आहे. सुभेदार केंद्रीय सत्तेचा प्रतिनिधी असे. महसुल, जमीनी लागवडीखाली आणने, गांवे वसवने, जातपंचायतींच्या निवाड्यांना मान्यता देणे (मजहरनामे) अशा त्याच्या जबाबदाऱ्या असत.

जहागीर, मोकासा हे अस्थिर हक्कांचे स्वामी असत. केंद्रीय सत्तेची मर्जी असेपर्यंत ते कायम रहात अन्यथा ते काढुनही

पान ३ वर...

पान २ वरून ...

घेतले जात असत. याउलट वतन अथवा इनाम हे मात्र वंशपरंपरेने कायमचे असत. (महाराष्ट्र आणि मराठे, ले. अ. रा. कुलकर्णी, पान २९)

सुभेदार कोणत्याही जहागीरदाराचा चाकर असु शकत नव्हता हे येथे स्पष्ट होईल. त्यामुळे दादोजींबाबतचे सर्वच प्रसंग काल्पनिक/कविकल्पना/प्रक्षिप्त दंतकथा या सदरात टाकुन देता येईल. दादोजींबाबतच्या जुन्या कल्पना दोन-तीन वर्षापर्यंत कायम होत्या. दादोजी आणि शिवराय यांचा संबंध नाही हे इतिहासकार मेहंदळेंनीही ३०-३२ वर्षांपुर्वी मान्यच केले आहे.

ब्रिगेडी इतिहासकार मात्र उलट माझा लेख येईपर्यंत दादोजींचा उल्लेख शहाजीराजांचा सामान्य चाकर अथवा नगण्य नोकर असा करत असत. हे त्यांचेही जर अज्ञान होते तर समजा पुरंदरेंचेही (१९५८ साली) मोगलकालीन महसुलपद्धतीबाबत असेल तर त्यात धक्कादायक काय आहे?

शिवाय प्रस्तुत पुस्तकात दादोजींच्या मृत्युनंतर फक्त एकदाच ओझरता उल्लेख आहे हेही लक्षात घेतले पाहिजे. अडिच प्रकरणांत इतर विषयांबरोबरच दादोजी प्रकरण आटोपते. (पुस्तकात एकुण ५२ प्रकरणे आहेत.)

**आक्षेप ३ :**

पुस्तकात ब्राह्मण माहात्म्य अधिक असुन शिवाजी महाराजांची प्रतिमा हिंदुत्त्ववादी व मुस्लिमविरोधी दाखवण्यात आली आहे.

हा आक्षेप अनेक शब्दांत, अनेक पद्धतीने नोंदवण्यात आला असल्याने मी फक्त आरोपाचा गाभा मांडला आहे. वरील आक्षेपांसाठी आपण पुस्तकातील काही नमुने पाहुयात.

यासाठी पान ८० व ८१ वाचले पाहिजे. यात चार दीर्घ परिच्छेदांत वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मण केवढ्या नालायक्यांना पोहोचले होते याचे उद्वेगजनक वर्णन आहे. नाशिक येथे ऐलतीरावरील मंदिरे फुटत असतांना पैलतीरावर वेदोनारायण पळीपंचपात्री घेऊन तिरिमिरीने भांडत होते. कशासाठी? तर, यात्रेकरुंपैकी ऋग्वेद्यांची पिंड कोणी पाडायची आणि यजुर्वेद्यांची पिंडे कोणीं पाडायची यासाठी!! ते वेदशास्त्र संपन्न शास्त्री-पन्डित केवळ वर्षासनाच्या भिकेसाठी, 'श्रीगोदातटाकीं आणि श्रीकृष्णातटाकीं स्नानसंध्या करुन हजरतसाहेबास दुवा देत.'

ब्राह्मणही पुरंदरेंच्या मागे का लागले नाहीत हे समजत नाही. वरील मजकुरालाच थोड्या अंतराने जोडून एकदा मने विकली की जपण्यासारखे काही उरतच नाही. कांहीही लिलावाला निघते. बायकासुद्धा! असे पुरंदरे ब्राह्मणांची इज्जत काढून म्हणतात पण आक्षेप याला नाही...

**आक्षेप वेगळाच आहे.**

वरील विधानानंतर सध्याच्या वादात आक्षेपार्ह मानले गेलेले अंतराने येणारे वाक्य म्हणजे, बऱ्या, नीटस, गोऱ्या जातीवंत कुणबिणी बाजारांत सहज 'पंचविस होनांस पांच' विकत मिळत होत्या. हे होय.

कुणबी आणि मराठे एकच असल्याने हे विधान मराठा पुरुषांची बदनामी करणारे आहे असे म्हटले जाते. वरकरणी पाहता ते खरेही वाटेल. अर्थात या वाक्याआधीचे ब्राह्मणांबाबतचे उद्वेग कसे व्यक्त झाले आहेत हे आपण थोडक्यात पाहिले.

१६३० च्या प्रलयंकारी दुष्काळात 'पुरुष बायका-मुलांना टाकुन जात होते. स्त्रिया, स्वतःला गुलाम म्हणून विकून घेत. आया बालकांची विक्री करीत. असे हृदयद्रावक वर्णण डच व्यापारी व्हान ट्विस्टने करुन ठेवले आहे. या दुष्काळाची वर्णने तुकाराम महाराज, रामदास, परमानंद यांनीसुद्धा करुन ठेवली आहेत. तुकोबांचे तर नुसते दिवाळे निघाले नाही तर पत्नी व मुलही गमवावे लागले. या दुष्काळात होनाजी निबरे नांवाच्या गृहस्थाने घर व जमीन २५ होनास विकली असे पत्रसारसंग्रह ३२९ मध्ये नमुद आहे. अशी त्याकाळातील अगणित उदाहरणे आहेत. इतकी की माणुस मृत माणसाला खात होता. (वरील माहितीसाठी संदर्भ: मराठे आणि महाराष्ट्र, ले. अ. रा. कुलकर्णी, पान १०८ ते ११६) आणि पुरंदरेंचे विवेचन नेमके १६२९-३० या काळातील स्थितीचे आहे. दुष्काळातील आहे.

पुरंदरेंनी 'कुणबिण' शब्द वापरला आहे आणि कुणब्याची बायको अथवा मुलगी म्हणजे कुणबीण असा अर्थ येथे घेतला गेलेला दिसतो. मराठा म्हणजे कुणबी हे सध्या समीकरण तेजीत असल्याने पुरंदरेंनी मराठा बायकांची बदनामी केली असा समज होणे स्वाभाविक आहे.

**पण वास्तव काय आहे?**

कुणबीन म्हणजे कुणब्याची बायको-पोर तर बटकी कोण होती? ती कोणाची बायको-पोर होती?

कुणबीण हा रखेली या शब्दाचा प्रतिशब्द बनला होता. बटकी म्हणजे घरकामासाठी राबणारी. कुणबीन म्हणजे कुणब्याची बायको नव्हे तर एखाद्या माणसाची विक्रय झालेली शय्यासोबतीन. यात लग्न अभिप्रेत नाही. ब्रिटिश काळ येईपर्यंत ही प्रथा होती. ब्रिटिश कुणबिनींना Concubine या अपभ्रष्ट शब्दाने ओळखत. या शब्दाचा इंग्रजी डिक्शनरीतील अर्थ 'a woman who cohabits with a man to whom she is not legally married, especially one regarded as socially or sexually subservient; mistress..' थोडक्यात ठेवलेली बाई. मग ती विकत घेतलेली असेल वा ती स्वेच्छेने राहत असेल.

जसा बटकीन या शब्दाचा जातीय अर्थ नाही तसाच कुणबिण या शब्दाचाही जातीय अर्थ नाही. कुणबिणी आणि बटकिणींचे क्रय-विक्रय हा महाराष्ट्रातील (अन्यत्र वेगळ्या नावांनी) सुरु असलेला फार जुना व्यवसाय आहे. पेशवे काळातही शनिवार वाड्यासमोर कुणबिण-बटकिणींचे बाजार भरत व पाच रुपये ते ऐंशी रुपये दराने त्यांची खरेदी होत असे अशा नोंदी उपलब्ध आहेत आणि या विकावु स्त्रीया कुणबाऊ समाजाच्याच असत असे नव्हे तर बव्हंशी सर्वच जातीतील असत. अशा सर्व स्त्रीयांना कुणबीन अशी संज्ञा होती. यामध्ये एकजातीयता शोधणे अनैतिहासिक आहे.

**आक्षेप ४ :**

हिंदुत्त्ववादी पुरंदरे मुस्लिम द्वेष्टे असुन शिवाजी महाराजांच्या मुस्लिम सेवक/सेनानींबद्दल ते नामोल्लेख करत नाहीत.

आपण पुरंदरेंच्याच पुस्तकातील काही उतारे पाहु.

१. पान २४६ वर पहा. या वेळीस महाराजांचे मुख्य मुख्य अंमलदार महाराजांच्या बरोबर घोडे दौडीत होते. पुढीलप्रमाणे हे अधिकारी होते. शामराज नीळकंठ रांझेकर (पंत पेशवे)...... नुरखान बेग सरनौबत (पायदळाचे सरसेनापती.), नेताजी पालकरांच्या सोबतीने सिद्दी हिलाल आहे. त्याचा मुलगा वाहवाह आहे. त्यांची स्वराज्यासाठीची अविरत दौड आहे. मुस्लिम म्हणुन लेखकाने त्यांना हिणवल्याचे दिसत नाही.

२. 'स्वराज्य वाढले. किती साधी माणसे ही? कुणी कुलकर्णी होता. कुणी रामोशी होता. कुणी मुसलमान होता. कुणी न्हावी होता. कुणी भंडारी होता. कुणी देशपांडे होता. कुणी महार होता. कुणी शेतकरी होता पण ह्या सामान्य माणसांनीच एकवटून असामान्य इतिहास निर्माण केला. (पान ४०७) .

३. केळशी येथे बाबा याकूत हे थोर अवलिये राहत होते. अल्लाच्या चिंतनावाचुन त्यांना दुसरे आकर्षण नव्हतें. अमीर वा फकीर त्यांना सारखेच वाटत. सच्चे परवरदिगार रहमदिल होते ते. महाराज त्यांच्या दर्शनास केळशीस आले व त्यांचे दर्शन घेऊन जंजिऱ्याच्या मुकाबल्यास त्यांनी हात घातला. (पान ९३८)

४. औरंगजेब उत्तरकाळात विक्षिप्त झाला. धर्मवेडाने वागु लागला. बाटवाबाटवी तर फार स्वस्त झाली. खरोखर त्या थोर प्रेषिताच्या पवित्र व 'सत्य' धर्माची अवहेलना त्याचेच अनुयायी म्हणवुन घेणारे करु लागले. औरंगजेब तर मुळचाच धर्मवेडा. कुराण शरीफ तोंडपाठ करुनहि बिचाऱ्याला त्यांतील ईश्वरी तत्त्वाचा बोध होऊ शकला नाही. हे सांगुन लेखक म्हणतो...

औरंगजेबाचे हे धर्मवेडे चाळे महाराजांना समजले. त्यांना अत्यंत दुःख झाले. कीव आली. रागहि आला. कोणता धर्म असा वेडगळ उपदेश करील, की लोकांवर क्रुर जुलुम करा, अन्याय करा म्हणून? धर्माचा संस्थापक म्हणजे ईश्वराचा अवतार. प्रेम दया शांतीचा गोड सागर. कोणत्या धर्मसंस्थापकाने असें सांगितले आहे की, माझ्या शिकवणुकीचा प्रचार करण्यासाठी वाटेल ते क्रुर अत्याचार करा म्हणुन? असे कोणीही सांगितलेले नाही. (पान ७५७)

हे वरील वाचता (मी नमुने दिले आहेत...असे अनेक आहेत.) पुरंदरेंना मुस्लिम द्वेष्टे म्हणावे? तरीही अजुन तुमची खात्री पटावी म्हणून सर्वच लोकांबद्दल त्यांची काय भावना आहे हे खालील वाक्यावरुन लक्षात येईल...

स्वराज्य वाढले. किती साधी माणसे ही? कुणी कुलकर्णी होता. कुणी रामोशी होता. कुणी मुसलमान होता. कुणी न्हावी होता. कुणी भंडारी होता. कुणी देशपांडे होता. कुणी महार होता. कुणी शेतकरी होता, पण ह्या सामान्य माणसांनीच एकवटून असामान्य इतिहास निर्माण केला. (पान ४०७).

यानंतरही त्यांना एकाच जातीचे, पक्षपाती ठरवायचे असेल तर खुशाल ठरवावे. खरे तर मुस्लिम हा शब्दच मुळात हजार पाने पुस्तकात दोन-तीनदा आला आहे. त्याऐवजी अफगाणी, मोगल, निजामशाही, आदिलशाही, सुलतान-सुलतानी असेच शब्द अधिकांश वापरलेले आहेत. मुर्तीभंजनाचा खेद व उद्वेग सर्वत्र दिसतो. त्यात काही प्रसंगी अतिशयोक्तीही आहे पण त्यातुन मराठी माणुस (मी आता मराठा शब्द टाळु म्हणतो.) आपत्तीविरुद्ध, आक्रमकांविरुद्ध आणि पारतंत्र्याविरुद्ध उभा राहत नाही, उलट स्वत्त्वे विकत गुलाम होतो याची चीड दिसते.

**आक्षेप ५ :**

फुटकळ मुद्यांना मी आता उत्तरे देत बसत नाही आणि कोणाचा वेळ वाया घालवु इच्छित नाही! पण तरीही 'आयबीएन लोकमत'वर जिजाऊंना कुंतीसारखे व्हायचे म्हणजे काय? हा संतप्त सवाल जितेंद्र आव्हाड यांनी चर्चेत केला होता. त्या संदर्भातील वाक्यही पुरेपुर तपासुन घेऊ. तत्पुर्वी याच पुस्तकातील पान क्र. ११३ वरील शहाजीराजांच्या, स्वातंत्रेच्छू सर्व धडपडींचे मुळ कोठे असेल आणि त्यांचे अंतःकरण चेतवणारी, सुलतानशाहीविरुद्ध बंडाची प्रेरणा देणारी आणि स्वतःच सत्ताधीश 'राजे' बनावे, अशी महत्त्वाकांक्षा फुंकरुन फुंकरुन फुलविणारी कोणती शक्ती राजांच्या मागे होती?

इतिहासाला माहीत नाही पण ती शक्ती, ती व्यक्ती असावी जिजाबाईसाहेब! शहाजीराजांच्या राणीसाहेब! (पान क्र. ११३)

**आता आव्हाडांच्या आक्षेपाकडे जावू.**

कुंतीसंबंधाने आव्हाडांनी अर्धवट विधान केले. संपुर्ण विधान असे आहे... जेंव्हा जिजाऊ गरोदर होत्या तेंव्हाचे.

तिला रामायण, महाभारत फार फार आवडे. राम, हनुमान, सीता, कृष्ण, द्रौपदी, कुंती, विदुला या सर्वांच्या कथा ऐकतांना तिच्या मनावर विलक्षण परिणाम होई. तिला वाटे, आपण नाही का कुंतीच्या पंगतीला बसु शकणार? तिचा भीम, तिचा अर्जुन अत्यंत पराक्रमी निपजले. त्यांनी राक्षस आणि कौरव मारले. सुखसमृद्धी धर्मराज्य स्थापन केले. कुंती वीरमाता, राजमाता ठरली. मला तिच्या पंक्तीला बसायचेय! बसेल का?

सोळाव्या शतकातील स्त्री-पुरुषांची मानसिकता काय होती? कुंतीला वरदानाने देवांपासुन मुले झाली. त्यात कोणाला कधी अश्लाघ्य वाटले नव्हते. विसाव्या शतकातही वाटत नाही. याला ब्राह्मणी अथवा वैदिक मानसिकता म्हणा पण वरील विधानात कुंतीला दैवी वराने नव्हे तर प्रत्यक्ष नियोगाने अथवा व्यभिचाराने मुले झाली हे अलीकडचे आकलन तेथे लादुन कसे चालेल? अर्थ एवढाच आहे की पांडवांपैकी पराक्रमी असलेल्या भीम आणि अर्जुनाप्रमाणे मुल व्हावे. मग कर्णाचे नांव पुरंदरेंनी घेतले नाही म्हणूनही छाती पिटता येईलच.

कोणतीही मिथककथा लक्षणार्थी घ्यायची की वाच्यार्थ याचे भान सुटले तर काय होणार? पुराणकथा ऐकतच बहुजन वाढले. आजही कीर्तन सप्ते लावणारे कोण आहेत? याच भाकडकथा सांगणारे बहुतेक कीर्तनकार आज बहुजनच आहेत. आपलेच पुरुष, स्त्रीया आणि मुले ते ऐकत आहेत पण त्यांना विरोध नाही.

**मग विरोध कोणाला आहे?**

कोणालाही करोत. सत्याला अंध विरोध मान्य नसतो. पुरंदरेंवर केले जाणारे आरोप मात्र केवळ वरकरणी ब्राह्मणी द्वेषातुन आहेत. हे, म्हणजे संघीय मुख्यमंत्री सिंधखेडराजाला यांच्या मांडीला मांडी लावुन बसणार आणि टुक्कार अनुयायांच्या हाती स्वर्ग देणार. नेत्यांचे खरे अंतर्मन तरी कोठे माहीत आहे?

**तरीही निष्कर्ष:**

पुरंदरेंना इतिहास सांगायचा नसुन आक्रमक, पारतंत्र्य आणि स्वराज्य यातील भेद ठळक करण्यासाठी एक प्रेरकता निर्माण करायची आहे असा सर्व पुस्तक वाचल्यानंतरचा एकमेव उद्देश दिसतो. इतर ब्राह्मणी लेखकांनी रामदासांचे फाजील लाड केलेत तसे पुरंदरेंनी कोठेही केलेले दिसत नाहीत. दादोजी हे शिवजीवनातील एक दुरस्थ पात्र आहे पण तत्कालीन समजुतींनुसार त्यांनी ते आपल्या कादंबरीत रंगवले आहे. त्यात जिजाऊंचा अवमान करण्याचा उद्देश्य दिसत नाही. मुस्लिम द्वेष नसुन स्वजन नाकर्ते आहेत याचा लेखकाला अधिक रोष दिसतो व त्याबद्दलचा संताप काही ठिकाणी व्यक्त झाला आहे. कुणनी-बटकिणी या संज्ञा जातीय नसुनही कुणब्याची पोरगी किंवा बायको असा सरधोपट अर्थ घेण्यात आला आहे. प्रत्यक्षात विकत जाणाऱ्या कुणबिणी कोणत्याही जातीतील असत व त्याचा अर्थ रखेल असा व्हायचा. बटकिण म्हणजे घरकामासाठी विकत घेतलेली बाई. हे शब्द ज्यांनी जन्माला घातले ते दोषी आहेत. स्वराज्यासाठी उपयोगी ठरलेल्या मुस्लिमांना त्यांनी डावलले आहे असेही दिसत नाही. इस्लामबद्दल शिवाजीमहाराजांच्याच माध्यमातुन लेखक काय म्हणतो हे मी वर नमुद केलेच आहे. त्यात कोठेही इस्लामबाबत द्वेषभावना दिसत नाही. संघविचारी इस्लामचा द्वेष करतात हे जगजाहीर आहे. या कादंबरीपुरते तरी मी म्हणू शकतो की संघविचाराच्या प्रभावातील ही कादंबरी नाही. कादंबरीत भावनोद्रेकिता, परिस्थितीवरील चडफडाट जसा आहे तशा अतिशयोक्त्याही आहेत. देवगिरीचे साम्राज्य कोसळल्यानंतर परिस्थितीची हतबलता महाराष्ट्रावर आलीच नव्हती असेही कोणी म्हणु शकणार नाही. अतिशयोक्तीचा भाग कादंबरी म्हणून वगळला की अशा स्वरुपाच्या घटना घडल्याच नाहीत असे म्हणायचे धाडस कादंबरी वाचल्यानंतर कोणी करु शकणार नाही. मागचे पुढचे संदर्भ न घेता एखादेच विधान व शब्द वेठीस धरले तर जगातील सर्वच पुस्तकांवर आक्षेप घेता येतील.

पुस्तक लिहिल्यानंतर पुढील काळात त्यांच्या (पुरंदरेंच्या) विचारांत/निष्ठेत बदल झाला असेल तर त्यावरची चर्चा वेगळी बाब आहे पण त्यांच्यावर आपल्या मनात येईल ते थोपणे योग्य नाही. पुस्तकातील भाषा ही अलंकारिक आहे. प्रभावी व प्रवाही आहे. अलंकारिकतेच्या तत्कालीन खांडेकरी पद्धतीचा तो दोष आहे. तरीही एक साहित्यप्रकार म्हणून त्यात रचनाशैलीचे अनेक दोष आहेत पण त्याची समीक्षा साहित्य समीक्षकांनी केली पाहिजे.ती समीक्षा करणे हा या लेखाचा उद्देशही नाही. जे आक्षेप घेतले जात आहेत त्यावर भाष्य करणे हा एकमेव हेतु यामागे आहे. मी दिलेली उत्तरे शक्यतो पुरंदरेंच्याच मूळ पुस्तकात काय आहे आणि आक्षेप काय आहेत यावर केंद्रित केले आहे.

◆ संजय सोनवणी
९८६०९९१२०५

# संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याची अभ्यासपूर्ण मांडणी

***‘संयुक्त*** महाराष्ट्राचा लढा’ हा साधासुधा, सामान्य विषयच नाही. संयुक्त महाराष्ट्रासाठी लढलेली माणसंदेखील खरोखरच मोठी! अगदी एस. एम. जोशींपासून, आचार्य अत्रे, क्रांतिसिंह नाना पाटील, अण्णा भाऊ साठे व शाहीर अमर शेखांपर्यंत कुठलंही नाव घ्या. माणसंच ताकतीची होती! काय झालं असतं ही माणसं नसती तर? उत्तर अवघड नाही. संयुक्त महाराष्ट्र यांच्याशिवाय झालाच नसता व नसता झाला तर काय झालं असतं? तर जिथं फुलं वेचली तिथंच जागोजागी ठोकरे खाण्याची वेळ मराठी जनतेवर आली असती. मात्र तसं झालं नाही हे आपलं नशीब! आता स्वतंत्र विदर्भाच्या नावाखाली काहींना पुन्हा भिकेचे डोहाळे लागले आहेत ही गोष्ट वेगळी! महाराष्ट्र तोडण्याची उबळ कोणाला येईल ते सांगता येत नाही असाच सध्याचा काळ आहे, मात्र संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचा काळ असा नव्हता. सामान्य मराठी जनतेनं घरादारावर तुळशीपत्र ठेवलं होतं व या लढ्यात उडी घेतली होती. या जनतेवर बंदुका रोखण्यात आल्या तेव्हा माणसं घाबरली नाहीत, पळाली नाहीत, तर मृत्युच्या नजरेला नजर भिडवत पाय रोवून उभी राहिली. संयुक्त महाराष्ट्राचं हे महाभारत घडत होतं तेव्हा य. दि. फडके नावाचा तरूण हे सगळं पाहत होता. मग तो या लढ्याचा मागोवा घेत राहिला. त्यातून पुढील काळात त्यानं या लढ्याचा सगळा इतिहासच लिहून काढला. तो दोन खंडात होता. ‘विसाव्या शतकातील महाराष्ट्र’ या ग्रंथाचे सातवा व आठवा असे ते दोन खंड. या आठव्या खंडातदेखील यदिंनी प्रदीर्घ अशी पाच प्रकरणे लिहून काढली. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या स्थापनेपासून ते तिच्या अस्तापर्यंत सगळं काही अगदी तपशीलवार लिहून काढलं.

या खंडाचं पहिलं प्रकरणच ‘संयुक्त महाराष्ट्र समितीचे आव्हान’ असं आहे. यात सुरूवातीलाच एक प्रसंग सांगितला आहे. दि. ६ फेब्रुवारी १९५६ साली पुण्यात एक सभा झाली. स्थळ होतं पुण्यातलं टिळक स्मारक मंदिर व सभा भरवली होती संयुक्त महाराष्ट्रवादी कार्यकर्त्यांनी. एस. एम. जोशी निमंत्रक होते व त्यांनी सगळ्याच पक्षातील जबाबदार नेत्यांना निमंत्रण दिलं होतं. काँग्रेस, हिंदू महासभा, भारतीय जनसंघ, समाजवादी पक्ष, प्रजासमाजवादी पक्ष, मजदूर किसान पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, लाल निशान गट, भारतीय कम्युनिस्ट पक्ष असा सगळा मेळाच जमला त्या दिवशी सभागृहात! याच ऐतिहासिक दिवशी संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना करण्याचं ठरलं व दि. ७ फेब्रवारी १९५६ पासून एस. एम. जोशी यांनी संयुक्त महाराष्ट्र समितीचे सरचिटणीस म्हणून सूत्रं हाती घेतली. मात्र ६ फेब्रुवारीला सभागृहात एस. एम. आपल्या भाषणात म्हणाले ते मोठं विलक्षण वाक्य होतं. काय म्हणाले एस. एम.? ‘‘मुंबईसह बेळगाव, कारवार असलेला संयुक्त महाराष्ट्र स्थापन होण्यासाठी लढा केला पाहिजे या मताचा मी आहे व तो लढा केल्याशिवाय मी राहणार नाही. नव्हे, मी स्वस्थ बसूच शकत नाही. मी उपोषण करणार नाही... त्यामुळं आध्यात्मिक हुकूमशाही निर्माण होते. जनतेला ज्यात भाग घेता येईल असाच लढ्याचा कार्यक्रम आखला जाईल.’’ एस. एम. असं म्हणाले, मात्र त्यांच्यासमोरच्या समस्या सोप्या नव्हत्या. जवळपास दहा पक्षांना त्यांना समितीच्या झेंड्याखाली बांधून ठेवायचं होतं. ते त्यांनी केलं हे विशेष! त्याचीही सगळी माहिती या खंडात वाचायला मिळते.

**विसाव्या शतकातील महाराष्ट्र – खंड आठवा**
**संयुक्त महाराष्ट्र चळवळ १९४८ ते जानेवारी १९५६**
**मौज प्रकाशन, मुंबई, संपर्क :** ०२२-२३८७१०५०
**किंमत :** ३०० रु., **पृष्ठ :** ३५६ पाने

मुंबईत तेव्हा संप, निदर्शने या गोष्टी सुरूच होत्या व दुसरीकडे एस. एम. समविचारी पक्षांची मोट बांधन्यात गुंतले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांशीदेखील आचार्य अत्रे व एस. एम. संवाद साधत होते. बाबासाहेबांच्या बाबतीत एक तिढा निर्माण झाला होता हे खरं. मुंबईचा समावेश महाराष्ट्रात करावा याबाबत बाबासाहेब अतिशय ठाम होते. मात्र ‘संयुक्त महाराष्ट्र’ या एकाच राज्यापेक्षा दोन राज्ये करावीत अशी सुचना त्यांनी दै. ‘लोकसत्ता’ दि. १९ मे १९५६ च्या अंकातून केली होती. त्याआधी दि. १ मे १९५६ रोजी बाबासाहेबांचं राज्यसभेत भाषण झालं होतं. त्यात त्यांनी ‘मराठवाड्याचं वेगळं राज्य का करू नये’ असाही प्रश्न उपस्थित केला होता. मात्र बाबासाहेबांच्या या सुचनेवर तेव्हा वृत्तपत्रातून टीका झाली होती हे लक्षात घेतलं पाहिजे. जानेवारी १९५६ मध्ये मुंबईत गोळीबार झाला होता. त्यात कित्येक संयुक्त महाराष्ट्रवादी कार्यकर्ते व अनेक निरपराध मारले गेले होते. जनतेत याचा रोष होता. लोकांना एकसंघ संयुक्त महाराष्ट्र हवा होता. त्यामुळं महाराष्ट्राची शकले होऊ न देणं हेच त्यावेळी महत्त्वाचं होतं व आता ते आणखी महत्त्वाचं होऊन बसलं आहे. त्यावेळीदेखील बाबासाहेब आंबेडकरांबद्दल शंभर टक्के आदर राखूनच ही चळवळ चालवली गेली. त्याचे बरेच तपशील इतिहासाची पाने चाळताना वाचायला मिळतात.



ग्रंथ देवो भव्!
महेश मांगले
९८२२०७०७८५

यदिंच्या या खंडातदेखील अनेक घटना व संदर्भांची रेलचेल आहे. यासंदर्भातले बाबासाहेबांबद्दलचे उल्लेख आचार्य अत्रे व प्रबोधनकार ठाकरे या दोघांच्या आत्मचरित्रातदेखील आढळतात. यदिंच्या याच खंडात मोरारची देसाई हा कसा दुष्ट प्रवृत्तीचा राजकारणी होता हेदेखील वाचायला मिळतं. पृष्ठ क्र. २४९ वर तो प्रसंगच यदिंनी दिला आहे. अलेक्झांडर कँपबेल हा अमेरिकेच्या ‘टाइम’ व ‘लाइफ’ या वृत्तपत्रांचा वार्ताहर. १९५४ ते १९५८ या काळात तो भारतातच राहत होता. १९५७ साली त्याचं ‘हार्ट ऑफ इंडिया’ हे पुस्तक प्रसिद्ध झालं. जानेवारी १९५६ मधील गोळीबाराबद्दल मोरारजींशी झालेली चर्चा त्यानं आपल्या पुस्तकात दिली आहे. हे गांधीवादी (?) काँग्रेसी मोरारजी काय म्हणाले असावेत कँपबेलला? ‘‘लांडग्याला त्याचा न्याय मिळालाच पाहिजे. त्याला दया दाखवू नका. हे महाराष्ट्रीय लांडगे आहेत... मला प्रत्येक महाराष्ट्रीयाला ठार करावे लागले तरी चालेल. शहरात मी पुन्हा सुव्यवस्था प्रस्थापित करीन.’’ (आय शाल रस्टोअर ऑर्डर इन बाँबे इव्हन आय हॅव टू शूट एव्हरी महाराष्ट्रीयन) मोरारजी असं म्हणाले त्यात काही आश्चर्य नव्हतं, पण म्हणून प्रत्येक गुजराती माणूस इतक्या हीन पातळीचा होता असं नाही. त्याचवेळी कच्छ, सौराष्ट्रसह महागुजरातसाठी आंदोलन होत होती व महागुजरातवाद्यांनी कधीही मुंबईवर दावा केला नव्हता. तसंच




महाराष्ट्राबद्दलदेखील अनुद्गार काढले नाहीत हेही लक्षात घेतलं पाहिजे. मोरारजीला महाराष्ट्राबद्दल इतका आकस का होता? तर वृत्तीच खुनशी व द्वेष करणारी होती. माणूसच तामसी होता तो! याच मोरारजींना महागुजरातवाद्यांनी देखील धिक्कारलं होतं. ऑगस्ट १९५६ मध्ये महागुजरातसाठी आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांवर गोळीबार करण्यात आला होता. अहमदाबाद येथील हे हत्याकांडदेखील भयानक होतं. मोरारजी त्या संदर्भात मगरीचे अश्रू ढाळत होते व गुजरातची जनता त्यामुळं संतापली होती. या घटनेचाही आढावा यदिंनी घेतला आहे.

चिंतामनराव देशमुख यांनी दि. १६ जुलै १९५६ रोजी केंद्रीय अर्थमंत्रीपदाचा राजीनामा दिला. मुंबईत झालेल्या गोळीबाराची चौकशी होत नाही हा त्यांचा मुद्दा होता. पंतप्रधान नेहरू स्वत:च्याच तंत्रानं वागत होते याचं देशमुखांना दु:ख होतं. केंद्रीय मंत्रीमंडळाला गृहित धरून नेहरू हे मुंबईबद्दल मनाला येईल तसे निर्णय घेत होते. या सगळ्याचा परिणाम देशमुखांच्या राजीनाम्यात झाला. त्या संदर्भातली देशमुखांची भूमिका या खंडात यदिंनी विस्तारानं दिली आहे. पृष्ठ क्र. ९७ ते १०१ यावर चिंतामनरावांची यासंदर्भातली मतं आली आहेत. दि. १६ जानेवारी १९६० रोजी दै. ‘केसरी’चा संयुक्त महाराष्ट्र विषेशांक प्रसिद्ध झाला होता. त्या विषेशांकासाठी दिलेल्या मुलाखतीत देशमुख म्हणाले होते, ‘‘काय वाटेल ते झालं तरी मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी होऊन द्यायची नाही, असा मी मनाशी निश्चय केला होता व त्यासाठी पडेल ती किंमत द्यावयास मी तयार झालो होतो. मला असं वाटतं की मुंबई शहर महाराष्ट्रापासून निराळे काढण्याचा डाव मी तीन वर्षांपूर्वी उधळून लावला.’’ देशमुखांनी सांगितलं ते सत्य होतं कारण त्यांच्या राजीनाम्यामुळे नेहरू-मोरारजींच्या कटकारस्थानांना मोठा शह बसला होता.

एक अत्यंत महत्त्वाचा प्रसंगदेखील यदिंच्या या खंडात आढळतो. दि. ५ जानेवारी १९६० रोजी यशवंतराव चव्हाणांनी सांगलीत भाषण केलं. ‘‘जातीयवादाच्या विषारी विचारापासून आपण महाराष्ट्राला मुक्त केलं पाहिजे.’’ हे यशवंतराव तेव्हा म्हणाले हे कसं करणार? तर त्यांचं पुढचं वाक्य होतं, ‘‘जातीयवादाचा हा विषारी विचारच समूळ नष्ट केला पाहिजे, तेव्हाच महाराष्ट्राचं सामाजिक मन एकजिनसी होईल.’’ त्याच दरम्यान ग. त्र्य. माडखोलकरांनी यशवंतरावांना प्रश्न विचारला होता, ‘‘भविष्यातलं महाराष्ट्र राज्य हे मराठा राज्य असेल का मराठी राज्य?’’ त्याला याच भाषणात यशवंतरावांनी उत्तर दिलं होतं, ‘‘माझ्या हातात सत्तेची सुत्रं असतील तोपर्यंत हे राज्य एका जातीचं, मराठ्यांचं किंवा आणखी एखाद्या जातीचं होऊ देणार नाही.’’

यशवंतराव चव्हाणांनी दिलेल्या उत्तराचं पुढं काय झालं? महाराष्ट्राचं राजकीय, सामाजिक ऐक्य कुठल्या अवस्थेत आहे? राज्याची आर्थिक परिस्थिती कशी आहे? हे प्रश्न आपल्याला पडावेत यासाठी तरी हा सगळा इतिहास वाचणं गरजेचं आहे.

■■

## शाहू बँकेचे सर्व संचालक बिनविरोध

**पुणे, (प्रतिनिधी) :** उत्तरोत्तर प्रगती पथावर राहणाऱ्या राजर्षि शाहू सहकारी बँकेने आपला बिनविरोध निवडून येण्याचा पायंडा जपला आहे. बँकेचे संस्थापक अध्यक्ष आबासाहेब शिंदे यांच्या नेतृत्त्वाखाली राजर्षि शाहू सहकार पॅनलचे सर्व उमेदवार पुढील पाच वर्षाच्या कार्यकाळासाठी बिनविरोध निवडून आले आहेत.

निवडून आलेल्या उमेदवारांमध्ये संभाजीराव पाटील, शिवाजीराव वाडकर, शांताराम धनकवडे, बाळासाहेब जगताप, दिलीप शिंदे, पद्माकर पवार, अभय मोहिते, सुदाम झेंडे तर महिलांमधून कमल व्यवहारे, मंगला जाधव यांचा समावेश आहे. याशिवाय इतर मागासवर्गीय गटातून सचिन पन्हाळे, कुसूम अडसुळे, सतीश नाईक अशा एकूण पंधरा सभासदांची बिनविरोध निवड झाली आहे.

१२ शाखांच्या माध्यमातून बँकेने ४७० कोटींच्या ठेवी तर ३०४ कोटींचे कर्ज वाटप केले आहे. बँकेचे खेळते भांडवल हे ५६६ कोटींचे आहे. तसेच यंदाचा बँकेचा निव्वळ नफा ७ कोटी ८२ लाख इतका असल्याची माहिती बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश पासलकर यांनी दिली.

## माध्यमांच्या स्वातंत्र्यावर फिरणार केजरीवालांचा झाडू

**नवी दिल्ली :** दिल्ली सरकारविरोधात आणि विशेषत: मुख्यमंत्र्यांची प्रतिमा मलिन होईल, असं कोणतंही वृत्त प्रकाशित केल्यास त्यांच्याविरूद्ध तक्रार करण्याचा फतवा अरविंद केजरीवाल यांनी काढला आहे.

मुख्यमंत्री किंवा दिल्ली सरकारची बदनामी होईल अशी बातमी प्रकाशित केल्यास प्रशासनातील कोणताही अधिकारी थेट मुख्य सचिवांकडे संबंधित माध्यम समूहाची तक्रार करु शकतो, असा आदेश मुख्यमंत्री केजरीवाल यांनी काढला आहे. त्यांच्या या फतव्यामुळे नव्या वादाला तोंड फुटले आहे.

कोणत्याही बातमीने दिल्ली सरकारची किंवा मुख्यमंत्री केजरीवालांची प्रतिमा मलिन होत असेल, तर त्या संबंधित बातमीची सचिव स्तरावर चौकशी करुन याबाबत माहिती दिल्ली सरकारच्या कायदा मंत्रालयाकडे पाठवली जाईल. त्यानंतर त्या माध्यम समूहाविरोधात दिल्ली सरकारकडून खटला दाखल केला जाईल असंही या आदेशात म्हटलं आहे. एवढंच नव्हे, तर बातम्यांवर लक्ष ठेवण्यासाठी दिल्ली सरकार खास कर्मचाऱ्यांची नियुक्तीही करणार आहे. या माध्यमातून सकाळी ११ ते रात्री ९ पर्यंत वृत्तवाहिन्यांवर लक्ष ठेवले जाणार आहे.

## सामर्थ्य...

***रस्त्याच्या*** कडेला फुटपाथवर त्यांचा उघडा संसार ताडपत्रीचं वेष्टन देऊन बंद केला होता. बाहेर भुरभुर पाऊस पडत होता आणि हिच्या पोटात भुकेचा. हिच्या पोटचा एक गोळा जीवाच्या आकांतानं भिजत भिजत सुगंध देणारे गजरे विकत होता, तर दुसरा गोळा भुकेनं तळमळत त्या दुसऱ्या गोळ्याकडं पाहत आभाळाएवढ्या आशेनं होता. दिवस मावळू लागला, गर्दी वाढू लागली. गजऱ्याचा सुगंध येईनासा झाला अन् पहिल्या गोळ्याची काळीकुट्ट देहयष्टीही दिसेनाशी झाली. आता काय करावं म्हणून ती दुसऱ्या गोळ्याच्या तोंडाकडं पाहून हुंदका दाबत होती. काही वेळात गजऱ्याचा नकोसा सुगंध अन् मागोमाग तो ही आला. त्याच्या हातात फक्त गजरे होते, जे भूक भागविणार तर नव्हतेच पण आशाही संपविणारे होते. तो धावत आला, ‘‘माय आलोच म्या...!’’ म्हणत गजरे ठेऊन धावत गेलादेखील.

काही वेळानं हातात दोन वडापाव अन् एक कोल्ड्रिंकची नवी कोरी बाटली घेऊन तो धावतच आला. तिनं ते पाहिलं. तिच्या पोटातली भूक आणखी चाळवली. त्यानं मोठ्या आनंदानं छोट्या गोळ्याला कोल्ड्रिंकची बाटली दिली. एकाएकी तिला काहीतरी झालं. तिनं वडापाव अन् बाटली हातात घेतली अन् जोरात ओरडत म्हणाली, मेल्या.... भुकेनं मेलोत तरी चोरी करून खायाचं नाय तुला सांगितलं होतं ना...!!’’ त्या काळ्या गोळ्याला जोरात धक्का देत तिनं ते शेजारच्या नाली ओतलं...

त्या मोठ्या गोळ्याच्या पोटात मोठा गोळा आला.

अन् हुंदका देत, ‘‘आए, चोरी नाय केली म्या, रस्त्यावर आलेल्या दोन पोरींनी दिलंय ते मला... कोनतरी त्यांना ‘समाजसेविका’ म्हणत होतं... चोरी नाय केली म्या...!’’ एवढं बोलण्याचं सामर्थ्यही त्याच्याकडे उरलं नाही.

■ **व्यंकटेश कल्याणकर**
९४०४२५१७५१

‘चपराक’ हे साप्ताहिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम वसंतराव पाटील यांनी वेद प्रिंटर्स, ५१८, शनिवार पेठ, पुणे ४११ ०३० येथे छापून शॉप नं. १, श्री दुर्वांकुर हौसिंग सोसायटी, १६१, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२ येथे प्रसिद्ध केले. **संपादक : घनश्याम वसंतराव पाटील.** (अंकातील मजकूराशी संपादक कदाचित सहमत असतीलही) (वाद-विवाद पुणे न्यायालयीन कक्षेत)

संपादकीय कार्यालय : ‘चपराक’, ६१७, ‘साईकृपा’, पहिला मजला, शाहू गणपतीसमोर, शिवाजी रस्ता, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२. भ्रमणध्वनी : ९२२६२२४१३२ Email : info@chaprak.com